| | |
|---|---|
| MHYA050024102025 | –: निकालपत्र :–<br>(घोषीत तारीख २४/०३/२०२६)<br>सरकार विरुद्ध विमल प्रकाश खिल्लारे |

१. अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता, माझ्यासमोर खालील प्रश्न उपस्थित होतो, त्यास खालील कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने असे शाबीत केले काय की, दिनांक २६/०१/२०२५ रोजी रात्री ८.०० वाजण्याच्या सुमारास मौजे काटखेडा, पुसद ता.पुसद, जि.यवतमाळ येथे आरोपी ही विनापरवाना व बेकायदेशिररीत्या १०० लिटर क्षमतेचा एका ड्रमममध्ये मोहाफुलाचा सडवा व २० लिटर क्षमतेच्या कॅनमध्ये १८ लिटर हातभट्टीची दारु व इतर साहित्य एकूण किंमत अंदाजे ५,८२०/– रुपये विक्री करण्याच्या उद्देशाने व स्वतःच्या आर्थिक फायद्याच्या उद्देशाने बाळगून होती आणि त्याअंतर्गत आरोपीने मुंबई दारुबंदी अधिनियम ६५(ई) नुसार अपराध केला? | **नाही.** |
| २. | काय आदेश? | **आरोपीस निर्दोषमुक्त करण्यात येते.** |

## –: कारणमिमांसा :–

**प्रश्न क्रमांक १ साठी**–

२. आरोपीविरुद्धचा गुन्हा सिद्ध करण्यासाठी अभियोगपक्षाने एकुण 'दोन' साक्षीदारांची साक्ष नोंदविलेली आहे. ***साक्षीदार क्रमांक–१ मांगिलाल भुरा राठोड*** व **हेड कॉन्स्टेबल** ***साक्षीदार क्रमांक–२ अनिल मेनाजी पिकले*** यांची साक्ष ***निशाणी क्रमांक–६*** वर नोंदविण्यात आली. अभियोगपक्षास वारंवार संधी देऊनही त्यांनी इतर स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी व पंच साक्षीदारांची यांची साक्ष घेतली नाही. अभियोगपक्षाने त्यांचा पुरावा ***निशाणी क्रमांक–१*** प्रमाणे बंद केला. आरोपीतर्फे कोणीही साक्षीदार तपासले नाही.

३. आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करण्याकरिता अभियोगपक्षने शाबीत करणे गरजेचे आहे की, दिनांक २६/०१/२०२५ रोजी रात्री ८.०० वाजण्याच्या सुमारास मौजे काटखेडा, पुसद ता.पुसद, जि.यवतमाळ येथे आरोपी ही विनापरवाना व बेकायदेशिररीत्या १०० लिटर क्षमतेचा एका ड्रममध्ये मोहाफुलाचा सडवा व २० लिटर क्षमतेच्या कॅनमध्ये १८ लिटर हातभट्टीची दारु व इतर साहित्य एकूण किंमत अंदाजे ५,८२०/– रुपये विक्री करण्याच्या उद्देशाने मिळून आली. ***पंच साक्षीदार क्रमांक–१ मांगिलाल भुरा राठोड*** यांची साक्ष ***निशाणी क्रमांक–६*** वर नोंदविण्यात आलेली आहे. उपरोक्त साक्षीदार हे घटनास्थळ व जप्ती

पंचनाम्यावरील 'पंच साक्षीदार' असून त्यांनी साक्षीदरम्यान कथन केले की, त्यांना घटनास्थळ व जप्ती पंचनामा करण्यासाठी पोलीसांनी बोलावले नव्हते. तसेच, पोलीसांनी त्यांच्यासमक्ष काहीही जप्त केले नाही. तसेच, पंचनाम्यातील मजकूर खरा नसल्याचे कथन केले. त्यांनी पंचनाम्यावरील त्यांची सही मान्य केली. पंच साक्षीदाराने अभियोगपक्षास मदत केली नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये साक्षीदार यांना उलटतपासात विचारता येतील असे 'सूचक प्रश्न' विचारण्यास परवानगी देण्यात आली. परंतु, उलटतपासातही उपरोक्त साक्षीदार यांच्या साक्षीतून घटनेच्यादिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी हा दोषारोपात नमूद केल्याप्रमाणे १०० लिटर क्षमतेचा एका ड्रममध्ये मोहाफुलाचा सडवा व २० लिटर क्षमतेच्या कॅनमध्ये १८ लिटर हातभट्टीची दारु व इतर साहित्य एकूण किंमत अंदाजे ५,८२०/– रुपये विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगून होता असे काहीही अभियोगपक्षास निष्पन्न करता आले नाही. त्यामुळे अभियोगपक्ष घटनास्थळ/जप्ती पंचनामा सिद्ध करु शकला नाही.

४. अभियोगपक्षातर्फे ***फिर्यादी साक्षीदार क्रमांक–२ अनिल मेनाजी पिकले*** यांनी कथन केले की, दिनांक २६/०१/२०२५ रोजी रात्री ८.०० वाजण्याच्या सुमारास मौजे काडखेडा, पुसद ता.पुसद, जि.यवतमाळ येथे आरोपी ही विनापरवाना व बेकायदेशिररीत्या १०० लिटर क्षमतेचा एका ड्रममध्ये मोहाफुलाचा सडवा व २० लिटर क्षमतेच्या कॅनमध्ये

१८ लिटर हातभट्टीची दारु व इतर साहित्य एकूण किंमत अंदाजे ५,८२०/– रुपयेचा मुद्देमाल जप्त केला. आरोपीला मुद्देमालाची विचारणा केली असता तो मुद्देमाल तिने तिचा असल्याचे सांगितले. सदर मुद्देमाल त्यांनी ***निशाणी क्रमांक–पी.१.पी.डब्ल्यु–२*** वरील घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार करुन जप्त केला. तसेच, ते पोलीस स्टेशनला आल्यांनतर त्यांचे सहकारी श्री.एस.जी.मानक यांनी ***निशाणी क्रमांक–पी.२.पी.डब्ल्यु–२*** वर प्रथम छापील खबर अहवाल दिला. त्यांनी घटनास्थळ पंचनामा मधील मजकुर खरा व बरोबर असल्याचे कथन केले व त्यांची सही ओळखली. तसेच, जप्त मुद्देमालातुन रासायनिक विश्लेषणाकरिता नमुना म्हणून पाठविल्याचे कथन केले. तपास नोंदविल्यानंतर त्यांनी दोषारोपत्र दाखल केले. सदर साक्षीदाराने उलटतपासात मान्य केले की, प्रस्तुत गुन्हयाकामी तपासास जाण्यापुर्वी त्यांनी मासिक डायरीला नोंद केली नव्हती. तसेच घटनास्थळावरील घर कोणाच्या मालकीचे आहे याबाबतदेखील त्यांनी चौकशी केली नाही. तसेच साक्षदीरांच्या बयाण नोंदविले नाही. ते घटनेच्यादिवशी कर्तव्यावर हजर होते किंवा कसे याबाबत लेखी पुरावा दाखल केलेला नाही. सदर साक्षीदाराने त्यांना विचारलेल्या इतर प्रश्नांना नकारार्थी उत्तर दिले.

५. अभियोगपक्षातर्फे आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता दिसून येते की, फिर्यादीने कथन केले आहे की, त्यांनी आरोपीच्या ताब्यातुन घटनेच्यादिवशी १०० लिटर क्षमतेचा एका ड्रममध्ये मोहाफुलाचा सडवा व २० लिटर क्षमतेच्या कॅनमध्ये १८ लिटर

हातभट्टीची दारु व इतर साहित्य एकूण किंमत अंदाजे ५,८२०/– रुपयेचा मुद्देमाल जप्त केला. परंतु, पंच साक्षीदार यांनी फिर्यादीच्या कथनास दुजोरा दिलेला नाही. तसेच, अभियोगपक्षाने फिर्यादीच्या कथनास दुजोरा मिळेल असा कोणताही पुरावा अभिलेखावर दिलेला नाही व इतर साक्षीदारांना देखील वारंवार संधी देवून देखील उपस्थित ठेवले नाही. तसेच, घटनास्थळ हे आरोपीच्या मालकीचे होते याबाबत देखील अभिलेखावर कोणताही कागदोपत्री पुरावा आलेला नाही.

६. वारंवार संधी देवूनही अभियोगपक्ष इतर स्वतंत्र साक्षीदार यांना तपासु शकले नाही. प्रस्तुत प्रकरणात रासायनिक विश्लेषणासाठी नमुना पाठविण्याबाबत केवळ प्रोफॉर्म दाखल केलेला आहे. परंतु, सदर नमुना वैज्ञानिक प्रयोगशाळेत जमा केल्याबाबत कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. तसेच, रासायनिक विश्लेषणाचा रिपोर्ट या खटल्यात तपासअधिकारी यांनी दाखल केला नाही. त्यामुळे फिर्यादीच्या कथनानुसार आरोपीच्या ताब्यात मुद्देमाल मिळाला हे मान्य केले तरी, मिळून आलेले द्रव्य हे मोहाफुलाचा सडवा व गावठी हातभट्टीची दारुच होती ही बाब अभियोगपक्षाने शाबीत केली नाही. त्यामुळे जप्त केलेले द्रव्य हा मोहाफुलाचा सडवा व गावठी हातभट्टीची दारुच होती व आरोपीच ती जप्त दारु विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगून होता किंवा कसे ही बाब सिद्ध होण्याइतपत सबळ पुरावा अभियोगपक्षाने न्यायालयासमोर आणला नाही. त्यामुळे अभियोगपक्षाने प्रस्तुतची केस सामान्य

बुद्धीच्या संशयापलीकडे सिद्ध केली नाही. सबब, आरोपीविरुद्ध मुंबई दारुबंदी अधिनियम ६५(ई) अन्वये गुन्हा केला हे सिद्ध करणारा सबळ पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही. परिणामतः आरोपीस निर्दोषमुक्त करण्यात येते. वरील कारणास्तव मी ***प्रश्न क्रमांक–१*** चे उत्तर ***नकारार्थी*** देत आहे.

**प्रश्न क्रमांक २ साठी**–

७. वरील सर्व साक्षी पुराव्याचे अवलोकन केले असता व प्रश्नांचे निष्कर्ष विचारात घेतले असता, अभियोगपक्ष आरोपीविरुद्धचे दोषारोप सबळ पुराव्याद्वारे सिद्ध करु शकला नाही. परिणामतः आरोपी निर्दोष मुक्ततेस पात्र आहे. सबब, मी ***प्रश्न क्रमांक–२*** चे निष्कर्षाकरीता खालील आदेश पारित करीत आहे.

| –: **आदेश** :– | |
|---|---|
| १. | फौजदारी प्रक्रिया संहिता १७९३ चे कलम २५५(१) अन्वये आरोपी **विमल प्रकाश खिल्लारे** रा.काटखेडा, पुसद ता.पुसद जि.यवतमाळ यांची मुंबई दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) अन्वये ठेवलेल्या अपरांधातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे. |

निशाणी क्रमांक–६

| | |
|---|---|
| ३. | प्रस्तुत गुन्ह्यातील जप्त केलेला मुद्देमाल १०० लिटर मोहाफुलाचा सडवा व १८ लिटर गावठी हातभट्टीची दारु नाश केली नसल्यास तो मुद्देमाल अपिल कालावधी नंतर राज्य उत्पादन शुल्क, पुसद यांच्याकडे नियमाप्रमाणे नाश करण्याकरिता पाठविण्यात यावा. |
| ४. | आरोपी यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ४८१ अन्वये वरिष्ठ न्यायालयात अपिल अथवा इतर अर्ज दाखल झाल्यास हजर राहण्यासाठी म्हणून दाखल केलेली रक्कम रुपये १५,०००/–(पंधरा हजार रुपये मात्र) चे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपात्राची मुदत ६ महिने राहिल. |
| ५. | **(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला).** |

स्वा/–

दिनांक २४/०३/२०२६

**(श्रीमती व्ही. डी. बिरहारी)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,पुसद (न्यायालय क्र.२)

ता. पुसद, जि. यवतमाळ.

**प्रमाणपत्र**

**मी प्रमाणित करते की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकूरातील शब्द न शब्द मुळ आदेशाप्रमाणे आहे.**

लघुलेखकाचे नाव – **श्री. ए. आर. दातीर (लघुलेखक)**

न्यायालयाचे नाव – न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र.२) पुसद .

पी.डी.एफ.अपलोड केल्याचा दिनांक – २६/०२/२०२६

स्वाक्षरित/–

लघुलेखक